# खासदार काळे यांचे संत बऱ्हाणपुरे देवस्थानला भेट

## मांडगाव येथे ब-हाणपूरे महाराज प्रकटदिन सोहळा



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. १५**

स्थानिक सार्वजनिक महादेव प्रकट मंदीर मांडगाव येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी १४ जानेवारीला श्री संत बऱ्हाणपुरे महाराज यांचा प्रकट दिन उत्साहाने भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी हजारो भक्त मोठया संख्येने उपस्थित होते. खासदार अमर काळे यांनी मांडगाव येथे संत बऱ्हाणपुरे महाराजांच्या मंदीरात जाऊन दर्शन घेतले. त्यानंतर प्रशासनाच्या वतीने खासदार अमर काळे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. खासदार काळे यांनी राजकीय भाषण टाळून त्यांनी लोकांना महाप्रसादाचा आवश्यक तेवढा कोठल्याही प्रकारची उष्टावळ न टाकता केवळ आवश्यक तेवढेच अन्न घेऊन महाप्रसादाचा आनंद घ्यावा असेही आश्वासन त्यांनी भाविकांना दिले. यावेळी खासदार अमर काळे यांचे सोबत जिल्हाध्यक्ष अतुल वांदीले, दशरथ ठाकरे आदींची उपस्थिती होती.

# सोलर पथदिव्यांमुळे ग्रामपंचायतीचा विज देयकाचा भार कमी होणार : पालकमंत्री डॉ. भोयर

## आरती चौक ते नालवाडी सोलर लाईटचे लोकार्पण



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. १५**

राज्यातील सर्व शासकीय शाळा, शासकीय कार्यालये, ग्रामपंचायतीचे विद्युत देयक शून्यावर आणण्यासाठी प्रत्येक शाळा, शासकीय कार्यालये, ग्रामपंचायती सोलरवर कार्यान्वित करण्याचा शासनाचा उद्देश आहे. यामुळे ग्रामपंचायतींचा पथदिव्यांच्या विजदेयचा भार कमी होणार असल्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले.

नालवाडी ग्रामपंचायतीच्यावतीने आरती चौक ते नालवाडी मार्गावर ४१ लक्ष रुपये खर्च करुन बसविण्यात आलेल्या सोलरवरील पथदिव्याचे लोकार्पण पालकमंत्र्यांच्याहस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला गट विकास अधिकारी समर्थ शेवाळे, सुनील गफाट, जयंत कावळे, किरण उरकांदे आदी उपस्थित होते.पुर्वी दत्तपूर ते आरती चौक हा मुख्य वर्दळीचा रस्ता होता. राज्य शासनाने गेल्या दहा वर्षात जिल्ह्याला अनेक महामार्गाने जोडून रस्त्याचे जाळे पसरविण्याचे काम केले आहे. सोबतच इतर विकासाच्या कामांना शासन प्राधान्य देत आहे. पुणे, नागपूर यासारख्या शहरात मेट्रो सुरु करण्यात आली असून पुढील काळात वर्धा पर्यंत मेट्रो सुरु करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे, असे पालकमंत्री म्हणाले.ग्रामीण भागाच्या विकासावर शासनाचा भर असून मोडकळीस आलेल्या ग्रामपंचायतीच्या इमारती नव्याने बांधण्यासाठी स्व.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत भवन बांधकाम योजना सुरु करण्यात आली आहे. योजनेंतर्गत जिल्ह्यातील २० ग्रामपंचायतीच्या इमारती नव्याने बांधण्यासाठी ४ कोटी रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला असल्याचे पुढे बोलतांना पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी सांगितले. यावेळी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी फलकाचे अनावरण व कळ दावून सोलर पथदिव्यांचे लोकर्पण केले. कार्यक्रमाला नालवाडी ग्रामपंचायत परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विश्व हिंदू परिषद विशेष संपर्क प्रमुख पदी गजानन मसाये

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा,दि.१५**

जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत विश्व हिंदू परिषद वर्धा जिल्हा कार्यकारिणीच्या मान्यतेने गजानन मसाये यांची वर्धा जिल्हा विशेष संपर्क प्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली. ही नियुक्ती विश्व हिंदू परिषद मंत्री शरद कोणप्रतिवार यांच्या हस्ते करण्यात आली. या वेळी जिल्हा धर्म प्रसार प्रमुख अजय भोंग, हिंगणघाट प्रखंड मंत्री देवा वाघमारे, मारोती सहारे, संतोष बघेल, पंकज



देशपांडे, कार्तिक उपस्थित होते..

नियुक्तीबद्दल विदर्भ प्रांत विहिपं मंत्री प्रशांत तितरे,विदर्भ प्रांत विहिपं स्वावलंबी भारत प्रमुख अटल पांडे, यवतमाळ विभाग विशेष संपर्क प्रमुख अजिंदर सिंग चावला, अध्यक्ष सुभाष राठी,विहिपं सहमंत्री अरविंद कोकाटे, बजरंग दल जिल्हा संयोजक महेश राउत, हिंगणघाट प्रखंड अध्यक्ष सुरेंद्र आगरे तसेच सर्व स्तरातून गजानन मसाये आदींनी आनंद व्यक्त केला.

# वाळूची चोरी गुन्हा दाखल

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा,दि. १५**

अवैधरित्या वाळूची चोरटी वाहतूक करणाऱ्या सिरसगाव (धनाढय) येथील कुणाल मिसाळ आणि बादल कामडी या दोघांवर गुन्हा दाखल केला, ही कारवाई कुरझडी ते इंझापूर रस्त्यावर केली, ठाणेदार पंकज वाघोडे यांच्या निर्देशात संजय पंचभाई हे पथकासह गस्तीवर असताना, एम. एच. ३२ एएक्स. १४८२ क्रमांकाचा ट्रॅक्टर येताना दिसला, त्यात वाळू होती.

# पिपरी (मेघे) येथे ट्रकची चोरी

**वर्धा, :** अज्ञात चोरटयांनी घरापुढे असलेला ट्रक चोरून नेला, ही घटना तडस ले आऊट ग्रामपंचायत जवळ पिपरी(मेघे) येथे १३ जानेवारी रोजी रात्रीच्या सुमारास घडली.

पिपरी (मेघे) येथील किशोर पांडुरंग उरकुडे यांच्या मालकीचा एमएच ३२ ए. जे. ६३६६ क्रमांकाचा दहा चाकाचा ट्रक घराबाहेर होता, १३ जानेवारी रोजी सकाळी चालकाला ट्रक दिसला नाही, ही माहिती मिळताच किशोर उरकुडे यांनी परिसरात शोधाशोध केली, पण, ट्रक मिळाला नाही, अज्ञात चोरटयाने ४९ लाख रुपये किमतीचा ट्रक चोरुन नेला, याप्रकरणी तक्रारीवरुन रामनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला, पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

# केळझर येथील सिध्दीविनायक देवस्थानात हरिनामाचा गजर

## गणेश जयंती व महालक्ष्मी उत्सवानिमित्त सात दिवसीय कार्यक्रम

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**सेलू, दि.१५**

विदर्भाच्या भूमीत अष्टविनायकापैकी एक असलेले केळझर येथील सिद्धीविनायक गणपती देवस्थानात१५ ते २३ जानेवारी दरम्यान सात दिवसीय उत्सवात विविध धार्मिक कार्यक्रम यामध्ये भागवत कथा, पालखी सोहळा, दहीहांडी व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. १५ रोजी घटस्थापना तहसीलदार शंकुतला पाराजे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी ठाणेदार देवेंद्र ठाकूर, पोलिस पाटील प्रकाश खंडाळे आदींची उपस्थिती होती.



२२ जानेवारीला महाअभिषेक ओएसडी डॉ. ज्ञानदा फणसे यांच्या हस्ते देवस्थानचे अध्यक्ष माधव ईरुटकर, सचिव सुभाष तेलरांधे यांच्या उपस्थितीत तर २३ जानेवारीला महालक्ष्मीचा अभिषेक पालकमंत्री डॉ. पंकज भोयर व उपेंद्र कोठेकर यांच्या उपस्थितीत विजय मुरारका यांच्या हस्ते होणार असून परिसरातील भजनी मंडळ या पालखी सोहळयात सहभागी होणार आहे.सात दिवसीय या धार्मिक महोत्सवास भाविकांनी मोठया प्रमाणात उपस्थित रहाण्याचे आवाहन संस्थाध्यक्ष माधव इरुटकर, सचिव सुभाष तेलरांधे तसेच विश्वस्त मंडळाचे गजानन नरड, महादेव कापसे, रामचंद्र इंगोले, अमोल भोगे, महेन्द्र घवघवे, अनिल तेलरांधे, किशोर महाजन , पोलिस पाटील प्रकाश खंडाळे ,ग्रामपंचायत कर्मचारी तसेच समस्त ग्रामस्थांनी केले आहे. महाप्रसादाचे आयोजन २३ रोजी दुपारी ३ते ६ वेळात करण्यात आले आहे.

# पतंग उडवताना विद्युत धक्क्याने १६ वर्षीय अर्थव गंभीर जखमी



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**हिंगणघाट,दि.१५**

मकर संक्रांतीच्या आनंदावर पाणी फेरणारी हृदयद्रावक घटना हिंगणघाट येथील माता मंदिर वार्डात घडली. सायंकाळी सुमारे ५.३० वाजताच्या सुमारास अर्थव बाळबुदे (वय १६) हा आपल्या घराच्या गच्चीवर पतंग उडवत असताना त्याची पतंग घराजवळील झाडाला अडकली.

पतंग काढण्याच्या प्रयत्नात गच्चीवरील लोखंडी रॉडने पतंग ओढत असताना घराच्या बाजूने जाणाऱ्या जिवंत विद्युत तारेचा रॉडला स्पर्श झाला. स्पर्श होताच अथर्वला जोरदार विद्युत धक्का बसला. या अपघातात त्याच्या उजव्या पायावरील पँटला आग लागून उजवा पाय गंभीररीत्या भाजला गेला.

जखमी अवस्थेत अथर्वला शहरातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. सध्या त्याची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे कळते. या घटनेमुळे पतंग उडवताना विशेषतः गच्च्यांवर आणि विद्युत तारा असलेल्या परिसरात अत्यंत खबरदारी घेणे किती आवश्यक आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले असून मोठी दुर्घटना टळल्याचे समाधान व्यक्त होत आहे.

# पारंपरिक नुत्यामध्ये आनंदी राज्य पातळीवर प्रथम



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आर्वी,दि. १५**

छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या युथ फेस्टिव्हल विद्यापीठा अंतर्गत होणारे खेळ तसेच पारंपरिक नृत्यामध्ये राज्य पातळीवर आनंदी गुल्हाणे हिने यश मिळवल्याने तिचे राज्य पातळीवर झालेल्या गुणवत्ता यादीत तिचे नामाकंण दाखल झाले.

अर्थातच ही राज्य पातळीवर झालेली छत्रपती संभाजीनगर येथे पार पडली तर नॅशनल लेव्हल ही स्पर्धा चेन्नई येथे मार्चमध्ये होणार आहेत. त्या मध्ये तिचे नामांकन दाखल झाले आहेत. आनंदीचे सर्वत्र कौतुक होत आहे. तिच्या या यशात तिचे मार्गदर्शक शिक्षक आणि आई-वडिलांचा सिंहाचा वाटा आहेत. तिच्या नेत्रदीपक यशाबद्दल पंकज गोडबोले, अविनाश टाके, सुनील टाके, विनोद चौकडे, अनिल लांडगे, गुणवंत गुल्हाने, अनुप खुणे यांनी चेन्नई येथे मार्चमध्ये होणाऱ्या स्पर्धेत ती यशाचा झेंडा निश्चितच रोवल्याशिवाय राहणार नाहीत अशी आशा व्यक्त केली.

# वाळूची चोरटी वाहतूक, ७ लाखांचा मुद्देमाल जप्त



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा ,दि.१५**

वाळूचे अवैध उत्खनन करून चोरटी वाहतूक करणाऱ्या रेती चोरट्यांवर पोलिसांनी कारवाई करत ७ लाख ७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई सावंगी (मेघे) पोलिसांनी केली.

पोलीस पथकाला गस्ती दरम्यान मिळालेल्या माहितीवरून त्यांनी इंझापुर ते कुरझडी रोडवर नाकाबंदी करीत ट्रॅक्टर थांबवून चालकास विचारपूस केली असता त्याने कुणाल शिवदास मिसाळ रा. शिरजगाव धनाडय असे नाव सांगितले.

ट्रॉलीची पाहणी केली असता वाळू दिसून आली. त्याच्याकडे कुलाही परवाना नसल्याचे पुढे आले. पोलिसांनी एम.एच. ३२ ए.एक्स. १४८२ क्रमांकाचा ट्रॅक्टर, नंबर नसलेली ट्रॉली तसेच वाळू असा सात लाख सात हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी कुणाल शिवदास मिसाळ, बादल भाष्करराव कामडी दोन्ही रा. शिरजगाव यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे, संजय पंचभाई, अनिल वैद्य, निखील फुटाणे, हर्षवर्धन मून, अमोल जाधव यांनी केली. पुढील तपास संजय पंचभाई करीत आहे.

# नवनिर्वाचित नगराध्यक्ष व उपाध्यक्षाचा सत्कार



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**हिंगणघाट, दि.१५**

शहरातील नवनिर्वाचित नगराध्यक्षा डॉ नयना उमेश तुळसकर व उपाध्यक्ष निलेश बाबाराव ठोंबरे यांचा सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना नगराध्यक्षा डॉ नयना तुळसकर यांनी शहरातील विकासा कामामध्ये कोणतेही पक्षीय भेदाभेद करण्यात येणार नाही असे मत मांडले. तर सर्वाच्याच सहकार्याने हिंगणघाट विकास करू अशी आशा उपाध्यक्ष निलेश ठोंबरे यांनी व्यक्त केले.

या सत्कार प्रसंगी शिवसेना विधानसभा संघटक राजु हिंगमीरे, शिवसेना शहर संघटक सोनु लांजेवार, प्रतिक चाफले, हर्षल धार्मिक, राहुल तालेवार, भास्कर पेंदे, विलास हांडे (शहर उपाध्यक्ष), कुलभूषण वासनिक, सतिष तांबोळी, निखिल ढाले, अनिरूध्द जामगडे, अनिकेत लासटवार, पांडूरंग मुसळे, कैलाश ठाकुर, चैतन्य नारायणे, गणेश कोल्हे, संदिप गोतमारे तसेच शहर महिला आघाडी प्रमुख सुनिता तांबोळी, रजनी गोस्वामी, कांता झोरे, मंदाकीनी ढाले, विधी चौव्हान, कुंदा रोठे तसेच शिवसैनिक उपस्थित होते.

# अपघातात जखमी महिलेचा मृत्यू

**वर्धा, :** अपघातात जखमी महिलेचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला, ही घटना धंतोली परिसरात रस्त्यावर घडली,

मृत महिलेचे नाव वंदना प्रमोद ढवळे रा. बेलगाव (झाडगाव) हे मु. कारला चौक, वर्धा असे आहे, टेलिफोनच्या खांबाला ऑटोची धडक लागल्याने त्यांना दुखापत झाली, त्यांना उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला, याप्रकरणी रामनगर पोलिसांनी नोंद केली. पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

# तृतीय पंथीयांना तक्रार नोंदविण्यासाठी हेल्पलाईन

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. १५**

तृतीयपंथीयांच्या समस्या सोडविण्याकरीता व त्यांची ओळख निश्चित करण्याकरीता केंद्र शासनाने नॅशनल पोर्टल फॉर ट्रांसजेंडर हे संकेतस्थळ सुरु केले आहे. तृतीयपंथीयांना काही तक्रारी किंवा समस्या असल्यास हेल्पलाईन क्रमांकावर सादर कराव्या, असे आवाहन करण्यात आले आहे.

तृतीयपंथीय हा समाजातील एक दुर्लक्षित घटक असून या घटकास समाजाकडून सापत्न व भेटभावाची वागणूक दिली जाते. नेहमीच भेदभाव



व सापत्न वागणूकीमुळे समाजातील हा घटक विकास प्रक्रियेपासून दुर्लक्षित राहीलेला आहे. त्यामुळे या घटकाचे शासनामार्फत मुलभूत अधिकाराचे संरक्षण करुन त्यांना विकासाची समान संधी उपलब्ध करुन देण्याकरीता केंद्र शासनाने तृतीयपंथीय व्यक्ती हक्काचे संरक्षण कायदा २०१९ व नियम २०२० संपूर्ण देशात लागू झाला आहे. त्याअनुषंगाने तृतीयपंथीय समाजातील व्यक्तींसाठी केंद्र शासनातर्फे स्वतंत्र पोर्टल तयार करण्यात आले आहे. या पोर्टलवर तृतीयपंथीयांसाठी १४४२७ हा राष्ट्रीय हेल्पलाईन क्रमांक जाहिर करण्यात आला आहे.

या हेल्पलाईन क्रमांकाद्वारे अडचणीचे निराकरण तसेच तक्रारी नोंदविण्यासाठी केंद्र शासनाची तृतीयपंथीय हेल्पलाईन सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

गरजूंनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याणच्या सहायक आयुक्तांनी केले आहे.

